महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १२१ वा | दिनांक : ०५/०२/२०२५ | वार : बुधवार

## अंजली दमानियांच्या विरोधात फौजदारी खटला दाखल करणार : धनंजय मुंडे



**मुंबई :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषद घेत मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात चांगलाच हल्लाबोल केला आहे. तसेच अंजली दमानिया यांनी दुसऱ्यांदा पत्रकार परिषद घेत पुन्हा एकदा अनेक आरोप धनंजय मुंडे यांच्यावर लावले आहेत. आता यावर आपण अब्रू नुकसानीचा फौजदारी खटला मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणार असल्याचा इशारा धनंजय मुंडे यांनी दिला आहे.

मंत्री धनंजय मुंडे यांनी ट्विट करत म्हंटले, अंजली दमानिया यांनी आज दिवसभरात दुसऱ्यांदा पत्रकार परिषद घेत पुन्हा एकदा खोटे व बेछूट आरोप केले आहेत. या विषयासह विविध विषयांवर मोघम आरोप करणाऱ्या अंजली दमानिया ताई यांच्या विरोधात आपण आता फौजदारी अब्रू नुकसानीचा खटला मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी आता ट्विट केले आहे.

यावर अंजली दमानिया यांनी देखील प्रत्युत्तर दिले आहे. अंजली दमानिया म्हणाल्या, धनंजय मुंडे आपल्याला अब्रू नुकसानीचा दावा दाखल करायचा असेल तर आपण खुशाल करा, ह्यात तुमच्यावरच कोर्ट ताशेरे ओढेल ह्यात मला काडीमात्र शंका नाही. मी वकील पण लावणार नाही, स्वतः ही केस हाई कोर्टात लढेन, असे त्या म्हणाल्या आहेत.

दरम्यान, अंजली दमानिया यांनी सकाळी एक पत्रकार परिषद घेत कृषी विभागाने मार्च २०२४ मध्ये राबवलेल्या विविध खरेदी बाबत अर्धवट माहितीच्या आधारे व एका वेबसाईटवरील भावांचे संदर्भ देत काही वस्तूंची चुकीच्या पद्धतीने खरेदी झाल्याचे आरोप करत कोट्यावधींचा घोटाळा झाल्याचा दावा केला होता.

तसेच सदरील खरेदी प्रक्रिया ही चुकीच्या पद्धतीने राबवण्यात आल्याचेही त्या म्हणाल्या होत्या. यावर तत्कालीन कृषी मंत्री व सध्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी ताबडतोब पत्रकार परिषद घेत सविस्तर खुलासा सादर केला तसेच संपूर्ण प्रक्रिया ही खरेदी प्रक्रियेच्या नियमातील तरतुदीनुसार तसेच राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री वित्त यांच्या मान्यतेनुसारच झाली होती असे स्पष्ट केले होते.

त्याचबरोबर अंजली दमानिया यांनी केलेल्या दाव्यांमध्ये कोणतेही तथ्य नसून, नॅनो खते देणाऱ्या इफको कंपनीकडून भारतात सर्वत्र एकाच दराने ही खते विकली जातात. मोठ्या प्रमाणात खरेदी असल्याने तरीसुद्धा संबंधित कंपनीकडे जवळपास आठ रुपये प्रति लिटर इतका दर कमी करण्यात आला होता तसेच हा दर देशात सर्वात कमी महाराष्ट्रात होता ही वस्तुस्थिती आहे.

त्याचबरोबर ने स्प्रे पंप खरेदी, कापूस भरणा बॅग खरेदी तसेच गोगलगाईंचा प्रादुर्भाव नष्ट करणाऱ्या मेटलडीहाईड या रसायन्याची खरेदी सुद्धा प्रमाणित शासकीय दराप्रमाणे तसेच अतिशय पारदर्शक पद्धतीने टेंडर प्रक्रिया राबवूनच करण्यात आले होते हे धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे यात कोणतेही प्रकारचा आर्थिक गैरव्यवहार झालेला नसल्याचे स्पष्ट होते.

अंजली दमानिया बिनबुडाचे व खोटे आरोप करून सनसनाटी निर्माण करतात आणि मीडियावर प्रसिद्धी मिळवून आपले हेतू साध्य करून घेतात असा धनंजय मुंडे यांनी केलेला आरोप अंजली दमानिया यांच्या चांगलाच जिव्हारी लागलेला दिसत असून आता अंजली दमानिया या विचलित झाल्या असून पुन्हा एकदा माध्यमांच्या समोर आल्या व बेछूट आणि बिनबुडाचे आरोप करत सुटल्याचे दिसून आले.

मागील ५८ दिवसांपासून कुठल्याही तपास प्रक्रियेवर काही प्रभाव पडू नये म्हणून शांत व संयमाने राहिलेले धनंजय मुंडे यांनी मात्र आता अंजली दमानी यांच्या खोट्या आरोपांवर मौन सोडले आहे. तर अंजली दमानिया यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी अब्रू नुकसानीचा खटला दाखल करणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

## फक्त एक मंत्री नाही, तर पूर्ण सरकारच भ्रष्ट : नाना पटोले



**मुंबई :** महाराष्ट्रात २०१४ ते १९ दरम्यानचे फडणवीस सरकार असो वा त्यानंतरचे शिंदे-फडणवीस आणि आत्ताचे भाजप युती सरकार असो, या सकारच्या काळात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात बोकाळला आहे. मलई खाण्याची स्पर्धाच तीन पक्षात सुरु असून केवळ एखादा मंत्री भ्रष्ट आहे असे नाही, तर संपूर्ण भाजप युती सरकारच भ्रष्ट आहे, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, भाजप युती सरकारचे मंत्रीमंडळ भ्रष्टाचारी, खुनी आहे, एका मंत्र्यांवर न बोलता सगळ्यांवरच बोलले पाहिजे. धनंजय मुंडे यांच्यावर जे गंभीर आरोप होत आहेत, ते निश्चितच चिंताजनक आहेत. पण हे सर्व भाजपच करत आहे, भाजपचाच आमदार खुलेआमपणे मुंडेंच्या भ्रष्टाचाराची पोलखोल दररोज करत आहे. पण मुख्यमंत्री काहीच कारवाई करत नाहीत. भारतीय जनता पक्ष, अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस व एकनाथ शिंदेंची शिवसेना यांच्यातील अंतर्गत वादाचा हा परिणाम आहे का? काँग्रेस पक्षाला त्यांच्या अंतर्गत भांडणात पडायचे नाही, असेही नाना पटोले म्हणाले.

राज्यात जनतेचे प्रश्न महत्वाचे आहेत, शेतकऱ्याचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत, सोयाबीन, धान, कांदा उत्पादक शेतकरी बरबाद झाला आहे. सरकारने बांगलादेशी महिलांना लाडक्या बहिणींचे पैसे दिले आहेत. राज्यात कायदा सुव्यवस्था बिघडली आहे. शिर्डीत कालच दोन हत्या करण्यात आल्या, महिला सुरक्षित नाहीत. परभणीतील सोमनाथ सुर्यवंशी या आंबेडकरी विचाराच्या तरुणाची हत्या पोलीसांनी केली. बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा फेक एन्काऊंटर करण्यात आला, ही सर्व गंभीर प्रकरणे सरकार लपवत आहे पण विरोधी पक्ष म्हणून या मुद्यांवर गप्प बसणार नाही, सरकारला या सर्वांची उत्तरे द्यावी लागतील, असे ते म्हणाले.

## संजय राऊतांना जादूटोण्यातील जास्त अनुभव

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अद्यापही मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यात राहायला न गेल्यामुळे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्याकडून टीका केली जात आहे. वर्षा बंगल्याच्या परिसरामध्ये जादूटोणा केल्याचा आरोप त्यांनी केला होता. या आरोपांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केवळ एका वाक्यात प्रतिक्रिया दिली. संजय राऊत यांना त्याच्यातला जास्त अनुभव आहे, याबाबत त्यांनाच विचारा, असा टोला एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांना लगावला.

मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प आज जाहीर करण्यात आला. या अर्थसंकल्पाबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज माध्यमांशी संवाद साधत प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांना संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांवर प्रश्न विचारला असता, त्यांनी संजय राऊतांच्या आरोपावर बोलण्याची मला आवश्यकता नाही, अशी प्रतिक्रिया देत जास्तीचे बोलणे टाळले.

संजय राऊत यांच्या आरोपांवर बोलण्याची मला आवश्यकता वाटत नाही. संजय राऊत यांना जादूटोण्यातील खूप जास्त अनुभव आहे. त्यामुळे वर्षा बंगल्याबाबत खरे काय आणि खोटे काय हे त्यांनाच विचारा, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

महाराष्ट्रात युसीसी लागू होणार का? असा प्रश्न विचारला असता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आम्ही सर्व जण यावर बसून चर्चा करू. त्यानंतर निर्णय घेऊन असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मुंबई महापालिकेच्या ठेवी महायुतीकडून मोडल्या जात आहेत, असा आरोप सातत्याने ठाकरे गटाकडून होत आहे. यावरून एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे. महापालिकेच्या ठेवी मोडल्या हा विरोधकांचा आरोप चुकीचा आहे. सध्या ८२ हजार ८०० कोटी रुपयांच्या ठेवी असूनही मुंबईतील विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली, असे ते म्हणाले. आरोप करणाऱ्यांना आम्ही कामातून उत्तर देतोय. त्यामुळेच मुंबईच्या तिजोरीत आज सात हजारांची भर पडली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ फेब्रुवारी २०२५


# जे.ई.एस. मध्ये पदवीदान समारंभ संपन्न




## विद्यापीठाची प्रतिमा मिलिन होईल असे कोणतेही कार्य विद्यार्थ्यांनी करू नये : प्राचार्य डॉ. महजर फारुकी

**जालना (प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे)** : माझा अध्यापन क्षेत्रातील प्रवास हा जेईएस महाविद्यालयातून सुरू झालेला असून जन्मभर पुरेल एवढा अनुभव व ज्ञानाची शिदोरी मला या महाविद्यालयाने दिलेली आहे म्हणून या महाविद्यालयाचे माझ्या जीवनामध्ये खूप मोठे स्थान आहे.

आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर, या विद्यापीठाची पदवी घेऊन जात आहात, या विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर महामानवाचे नाव जोडले गेलेले आहे ,म्हणून या विद्यापीठाची प्रतिमा मलीन होईल असे कोणतेही कार्य आपण करू नये असे प्रतिपादन मौलाना आझाद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मजहर फारुकी यांनी व्यक्त केले.

जेईएस महाविद्यालय जालना च्या वतीने आयोजित पदवीदान समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजी नगर येथील मौलाना आझाद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मजहर फारुकी होते. पदवीदान कार्यक्रमाचे अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते.

पदवीदान समारंभात बोलताना डॉ. मझर फारुकी म्हणाले की, सध्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत असून मूल्य शिक्षणाचा ही यात अंतर्भाव करण्यात आला आहे ज्ञानाबरोबरच आपण समाजामध्ये वावरत असताना नैतिक मूल्यांची जपणूक करावी तसेच समाजासाठी बांधिलकी बाळगावी.

सध्या समाजामध्ये नाव ठेवण्याची चुकीची प्रथा बळावत आहे म्हणून आपण केवळ कोणालाही कोणत्याही सिस्टीमला नाव ठेवत बसण्यापेक्षा त्यामधून चांगले काय घेता येईल याचा नेहमी विचार करावा असेही डॉक्टर फारूकी यांनी सांगितले. आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, विद्यापीठास विश्वविद्यालय असे संबोधले जाते. आपण जी पदवी संपादित केलेली आहे ती संपूर्ण जगभरामध्ये मान्य आहे. म्हणून जी संस्था ही पदवी देत असते त्यास विश्वविद्यालय असे म्हटले जाते. पदवी घेतली म्हणजे ज्ञानसंपदानाची प्रक्रिया पूर्ण झाली असे नसून ज्ञानसंपदानाची ही पहिली पायरी असते. म्हणून विद्यार्थ्यांनी इथेच न थांबता जास्तीत जास्त ज्ञान व कौशल्य आत्मसात करावीत असेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.

सुरुवातीला पाहुण्यांना एन सी सी च्या कॅडेट तर्फे मानवंदना देण्यात आली. यावेळी उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते यांच्या नेतृत्वामध्ये वाजत गाजत विद्यापीठ ध्वजाची मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे मुख्य संयोजक उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते, आयक्यूएसी चे समन्वयक डॉ. गणेश रोकडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गणेश कुलकर्णी यांनी केले तर आभार डॉ. मनीषा सुतार यांनी मानले .यावेळी महाविद्यालयाचे विविध विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक- प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मातोश्री गंगादेवी माधवराव पाटील यांचे चतुर्थ पुण्यस्मरण



मुरुम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात मातोश्री गंगादेवी पाटील यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना अशोक सपाटे, रवींद्र आळंगे, शिला स्वामी, विजयालक्ष्मी भालेराव व अन्य.

**मुरुम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : येथील स्व. गंगादेवी माधवराव पाटील यांची मंगळवारी (ता. 4) रोजी चौथे पुण्यस्मरण श्री माधवराव पाटील महाविद्यालय व माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी येथे साजरे करण्यात आले. स्व. मातोश्री गंगादेवी माधवराव पाटील यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रा. डॉ. रवींद्र आळंगे, प्रा. दयानंद बिराजदार, डॉ. सुभाष हुलपल्ले, डॉ. अविनाश मुळे, डॉ. शिला स्वामी, डॉ. नागनाथ बनसोडे, डॉ. राम बजगिरे, डॉ. महेश मोटे, डॉ. नागोराव बोईनवाड, प्रा. गोपाळ कुलकर्णी, अशोक कलशेट्टी, विजयालक्ष्मी भालेराव, राजू ढगे, दत्तू गडवे, महादेव पाटील, डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. अशोक बावगे, प्रा. अरुण बावा आदींची उपस्थिती होती.

प्रा. अजिंक्य राठोड, प्रा. पायल आगरकर, प्रा. वैष्णवी पाटील, प्रा. विनंती बसवंतबागडे, प्रा. राजनंदिनी लिमये, प्रा. सदफअलमास मुजावर, प्रा. प्रियंका काजळे आदींनी पुढाकार घेतला. प्रतिभा निकेतन विद्यालयात मुख्याध्यापक करबसप्पा ब्याळे, उपमुख्याध्यापक उल्हास घुरघुरे, परिवेक्षक विवेकानंद परसाळगे, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलमध्ये मुख्याध्यापिका अनुराधा जोशी, सच्चिदानंद अंबर, डॉ. पुरुषोत्तम बारवकर, भुसणीचे मुख्याध्यापक तात्यासाहेब शिंदे तर नूतन विद्यालयात राजशेखर कोरे, लक्ष्मी पवार आदींच्या हस्ते मातोश्री गंगादेवी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालय, प्रतिभा निकेतन विद्यालय, मुरुम, कोथळी, भुसणी व नूतन प्राथमिक शाळा, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल, मुरुम आदी विद्यालयातही अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.

मातोश्री गंगादेवी माधवराव पाटील यांनी प्रतिकूल काळात स्वर्गीय माधवराव (काका) पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्यामुळे त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव माजी राज्यमंत्री बसवराज पाटील हे राज्याचे सक्षम नेतृत्व करत सामाजिक-राजकीय क्षेत्रात एक वेगळा ठसा उमटविला आहे. तरदुसरे चिरंजीव धाराशिव जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील हे सहकार क्षेत्रातून जिल्ह्याचे नेतृत्व करीत आहेत. कृषी व शिक्षण क्षेत्रात देखील त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

त्यांचे नातू शरण पाटील राज्यभर युवकांची बांधणी करून युवकांचे संघटन वाढवीत आहेत. उमरगा जनता बँकेच्या माध्यमातून तरुणांना अधिक व्यवसायभिमुख बनवून सहकार क्षेत्र अधिक मजबूत करण्यावर त्यांचा भर आहे.

या सर्वांना सुसंस्कारित विचार देण्यामध्ये मातोश्री गंगादेवी माधवराव पाटील यांचा मोलाचा वाटा राहिला, असल्याचे अशोक सपाटे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.







# १९ व्या विद्रोही साहित्य संमेलन कार्यवाह पदी भाऊसाहेब जाधव व राजानंद सुरडकर







**छ. संभाजीनगर (अरूण थोरात) :** येथे आयोजीत १९ व्या विद्रोही साहित्य संमेलन स्वागतसमिती निवड कार्यवाहपदी निवृत्त उपजिल्हाधिकारी भाऊसाहेब जाधव व प्रख्यात चित्रकार राजानंद सुरडकर, तर मुख्य समन्वयकपदी एड वैशाली डोळस व प्रा. भारत शिरसाठ यांची निवड करण्यात आली आहे.विद्रोही संस्कृती चळवळ महाराष्ट्र, च्या वतीने यंदाचे १९ वे विद्रोही मराठी साहित्य संमेलन छ.संभाजीनगर (औरंगाबाद) येथे दि. २१, २२, २३ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

संविधान मूल्यांना समर्पित सत्यशोधक समाज १५१ वर्षपूर्ती आणि भारतीय प्रजासत्ताकाच्या अमृत महोत्सवी वर्ष निमित्ताने आयोजित हे संमेलन असणार आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी वर्चस्ववादी ग्रंथकार सभेला लिहिलेले पत्र हे विद्रोही सांस्कृतिक चळवळीचा जाहीरनामा आहे.

आमच्या ग्रंथकार सभा आम्ही भरवू असे म.ज्योतिराव फुले यांनी या पत्रात म्हटले होते. वर्चस्ववादी ब्राम्हणी ग्रंथकार सभांना विधायक नकार देत आम्ही आमच्या ग्रंथकार सभा सुरू केल्या आहेत. आमची ग्रंथकार सभा म्हणजे विद्रोही साहित्य संस्कृतीचा महाप्रवाह आहे. विद्रोही सांस्कृतीक चळवळ जीवनाच्या सर्व क्षेत्रात समतावादी संस्कृती, साहित्य व विचारांचा पुरस्कार करते.

विद्रोही साहित्य चळवळीच्या वतीने आजवर मुंबई कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, सोलापूर, नंदुरबार, वाशी, पुणे, मनमाड, धुळे, परभणी, बुलढाणा, हिंगोली, नाशिक, उदगीर, वर्धा, अमळनेर, इत्यादी ठिकाणी संमेलने आयोजित करण्यात आली आहेत.

साहित्यिक बाबुराव बागुल, वाहरू सोनवणे, डॉ.यशवंत मनोहर, डॉ अजिज नदाफ, आत्माराम कनीराम राठोड, तारा रेड्डी, तुळशी परब, डॉ.आ.ह. साळुंखे, संजय पवार, जयंत पवार, उर्मिला पवार, श्रीराम गुंदेकर, विमल मोरे, प्रल्हाद लुलेकर, डॉ प्रतिभा अहिरे, डॉ आनंद पाटील, गणेश विसपुते, चंद्रकांत वानखेडे, डॉ वासुदेव मुलाटे यांसारख्या सर्जनशील साहित्यिकांनी विद्रोही साहित्य संमेलनाची अध्यक्षपदे भूषवली आहेत. बहुभाषिकता, धार्मिक व सांस्कृतिक बहुविविधतेसह संविधान मूल्यांना समर्पित १९ वे अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलन अजंठा वेरूळच्या अजरामर शिल्पकृतींचा वारसा सांगत, दख्खनच्या शिवस्वराज्य केंद्रात, वारकरी संतांच्या मराठवाड्यात, मलिक अंबरच्या कर्मभूमीत, सत्यशोधक ज्ञानगिरी या बुवांच्या जन्मस्थळी, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्ञानदान नगरात, मराठवाडा स्वातंत्र्ययोद्धांच्या व समतावाद्यांच्या छत्रपती संभाजीनगर मध्ये आयोजित करण्यात आले आहे.

अघोषित आणीबाणीला नकार देण्यासाठी, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आणि बहुजनांच्या समता संस्कृतीचा आवाज बुलंद करण्यासाठी संविधान सन्मानासाठी होणाऱ्या या १९ व्या विद्रोही संमेलन स्वागत समितीच्या कार्यवाहपदी निवृत्त उपजिल्हाधिकारी सत्यशोधक भाऊसाहेब जाधव व चित्रकार राजानंद सुरडकर, मुख्य समन्वयक पदी प्रा.भारत शिरसाठ व एड. वैशाली डोळस तर उपाध्यक्षपदी संविधान विश्लेषक अनंत भवरे, सविता अभ्यंकर व एड.अभय टांकसाल यांची तर सहकार्याध्यक्षपदी डॉक्टर सुनिता शिंदे यांची आणि सहकार्यवाह पदी मा.ग.ह.राठोड व कॉम्रेड मधुकर खिल्लारे यांची निवड करण्यात आल्याची घोषणा स्वागताध्यक्ष इंजी. सतीश चकोर व मुख्य निमंत्रक एड.धनंजय बोर्डे यांनी विद्रोही सांस्कृतिक चळवळी च्या राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी , पदाधिकारी किशोर ढमाले, डॉ धोंडोपंत मानवतकर, जितेंद्र भवरे, रामदास अभ्यंकर यांच्या उपस्थितीत केली. अशी माहिती इंजि. सतीश चकोर-स्वागताध्यक्ष, एड. धनंजय बोर्डे- मुख्य निमंत्रक, प्रा. प्रतिमा परदेशी- राज्याध्यक्ष, किशोर ढमाले- कार्य संघटक, के ई हरदास - खजिनदार, खालिद अहमद- कार्याध्यक्ष यांनी दिली.

## डॉ. नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठाच्या माध्यमातून डिजिटल शिक्षण सुरू होणार



**पुणे :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारिणीची दोन दिवसीय बैठक रत्नागिरी येथे संपन्न झाली. या बैठकीसाठी राज्यभरातून १७ जिल्ह्यातून १२५ अंनिस कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष, जिल्हा प्रधान सचिव, राज्य विभागांचे कार्यवाह, राज्य कार्यकारिणीचे सदस्य, सल्लागार मंडळाचे सदस्य आणि क्रियाशील कार्यकर्ते उपस्थित होते.अंनिस तर्फे डिजिटल स्वरुपात 'डॉ. नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठ' सुरू करणार असल्याचं निर्णय यावेळी घेण्यात आला.

या अंनिसच्या राज्य कार्यकारणी बैठकीमध्ये संघटनेच्या पुढील कामाची दिशा म्हणून महत्त्वाचे सहा ठराव घेण्यात आले. अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा प्रचार समाजात नव्या शैक्षणिक माध्यमातून व्हावा म्हणून अंनिस तर्फे 'डॉ. नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठ' स्थापन करून त्याव्दारे विविध ऑनलाईन कोर्सेसचे अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणे.जादूटोणा विरोधी कायदा राष्ट्रीय पातळीवर व्हावा या साठी देशपातळीवर पाठपुरावा करणे.सुशिक्षितांचा अंधश्रध्दा या विषयी प्रबोधन अभियान राबवणे.आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह ,सत्यशोधकी विवाह करू इच्छिणाऱ्यांची माहिती संकलित करून अंनिसच्या राज्यस्तरीय आंतरजातीय आंतरधर्मीय विवाह वधू वर सूचक मंडळाचे काम सुरू करणे.जोडीदाराची विवेकी निवड आणि मानसिक आरोग्य या विषयी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी निर्माण करणे.

सोशल मिडिया मधून पसरवल्या जाणाऱ्या अंधश्रद्धा आणि मोबाईलचे व्यसन या विषयी काम करण्यावर भर देणे. मार्च महिन्यात विदर्भात नागपूर येथे राज्यव्यापी 'अंधश्रद्धा निर्मूलन महिला परिषद' घेण्याचे देखील या बैठकीत निश्चित करण्यात आले. तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने 'संघटना बांधणी अभियान' फेब्रुवारी २०२५ ते मे २०२५ पर्यंत राबवण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत मध्यवर्तीचे दोन प्रतिनिधी महाराष्ट्रातील अंनिसच्या सर्व शाखांना भेटी देतील. गेल्या सहा महिन्यात अंनिस तर्फे राज्यभरात राबवलेल्या विविध उपक्रम अहवालाचे वाचन राज्य कार्यकारी समिती सदस्य अ‍ॅड. मुक्ता दाभोलकर, अण्णा कडलासकर यांनी केले. त्यानंतरच्या दोन सत्रात महाराष्ट्रातील राज्यभरातून आलेल्या जिल्हा कार्याध्यक्षांनी, सचिवांनी आपल्या जिल्ह्याचा कार्य अहवाल राज्य कार्यकारणीसमोर सादर केला.

दोन दिवसांच्या या राज्य कार्यकारणीचे संयोजन विनोद वायंगणकर, राहुल थोरात, राधा वणजू, वल्लभ वणजू, मधुसूदन तावडे, अतुल तांबट, मिलिंद देशमुख, नंदिनी जाधव, प्रा. प्रवीण देशमुख, सम्राट हटकर यांनी केले. दिपक गिरमे, गणेश चिंचोले डॉ. हमीद दाभोलकर, राजीव देशपांडे, रामभाऊ डोंगरे उपस्थित होते.

## स्वराज विद्यालयाच्या स्नेहसंमेलनात मुलांच्या कलागुणांना मिळाला वाव



**छत्रपती संभाजीनगर :** स्वराज प्राथमिक व डॉ. टी. पी. पाटील माध्यमिक विद्यालय, खोडेगाव येथे मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन अलका महेश पाटील यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या संचालक डॉ. नेहा भोईटे उपस्थित होत्या. या वेळी पंचायत समिती सदस्य कल्याण गायकवाड, घारदोनचे सरपंच अनिल राठोड, नारायण डिघुळे, शाहीनाथ हुलसार, रामनाथ ढगे, भरत हुलसार, अशोक हुलसार, संजय ढगे, शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब सपकाळ, प्राथमिकचे मुख्याध्यापक भागवत दिवटे, शांताराम जाधव, गजानन मोटे, विनोद होंडे इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ फेब्रुवारी २०२५


## विद्यार्थ्यांमध्ये अर्थसाक्षरता काळाची गरज : सेबीचे ट्रेनर जगदीश माने



**अहमदनगर :** विद्यार्थ्यांन मध्ये शेअर मार्केट बद्दल जनजागृती निर्माण करणे , विद्यार्थीदशेमध्ये आपले स्वतःचे आर्थिक नियोजन करता यावे , फसव्या आर्थिक योजनेपासून त्याना दूर ठेवणे, विद्यार्थ्यां मध्ये आर्थिक शिस्त निर्माण करणे, हे काही उद्देश समोर ठेऊन अर्थसाक्षरता या कार्यशाळेचे आयोजन महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर,'करिअर कट्टा' यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले .

या कार्यशाळेत बोलते वेळी श्री जगदीश माने ,सेक्युरटी मार्केट स्मार्ट ट्रेनर सेबी यांनी विद्यार्थ्यांना वित्तीय व्यवस्थापन म्हणजे काय, वित्तीय व्यवस्थापनाच्या पायऱ्या, चलनवाढीचा दैनदिन जीवनावर होणार परिणाम ,विविध वित्तीय गणनयंत्र (कॅल्क्युलेटर), विवीध वित्तीय उत्पादने वेगवेगळ्या गुंतवणुकीचा वेगवेगळा परतावा, भांडवल बाजार, म्युच्युअल फंड, सर्वैगन्सी गोल्डन बॉड योजना आणि एन. एस. इ. या बाबत विस्तृत माहीती दिली.

या कार्यशाळेचा समारोप करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.जे.बार्नबस म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अभ्यास करून काळजीपूर्वक या क्षेत्रामध्ये गुंतवणूक करावी आणि आपल्या जीवनात आर्थिक सुबत्ता निर्माण करावी.या कार्यशाळेचे आयोजन झूम या प्लॅटफॉर्म ऑनलाइन पद्धतीने दि ३१ /०१/ २०२५ रोजी ५:०० ते ६:०० या वेळेत घेण्यात आली .या वेळी ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोद्वला .या वेळी प्रा खाडे सर व डॉ प्रवीण मोरे सर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.डॉ भागवत परकाळ, समन्वयक करिअर कट्टा अहमदनगर महाविद्यालय अहमदनगर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार उद्योजकता विकास समन्वयक प्रा .डॉ तुषिता आय्यर यांनी मानले.या वेळी उपप्राचार्य प्रा .दिलिपकुमार भालसिंग विनाअनुदान विभागाचे समन्वयक प्रा .डॉ सय्यद रज्जाक उपप्राचार्य डॉ प्रीतमकुमार बेदरकर , उपप्राचार्य डॉ नोयाल पारगे तसेच प्रबंधक पीटर चक्रनारायण यांचे सहकार्य लाभले.

## डोंगर पट्टीत बिबट्यांच्या भीतीमुळे ऊस लागवड क्षेत्रात मोठी वाढ



**कन्नड (अरुण थोरात):** लांडग्यांमुळे जंगल वाढल्याच्या विदेशी कथा ऐकवित होत्या. परंतू आता बिबट्यां मुळे ऊस लागवड क्षेत्रात वाढ झाल्याचे चित्र सध्या कन्नड तालुक्यातील डोंगरपट्टी भागात दिसत आहे.आता कन्नड तालुक्यात एक ही गाव उरले नाही की, जेथे रानडुक्कर, बिबट्यांचे वास्तव्य नाही.

गेल्या दहा वर्षात बिबट्यांची संख्या झपाट्याने वाढल्याने अनेक पाळीव जनावरांच्या शिकारी तर काही ठिकाणी बिबट्या कडून माणसां वरती हल्ला झाल्याच्या घटना घडल्या आहे. त्यामुळे या नवख्या संकटा मुळे शेतकरी चिंतेत आहे. भीती मुळे डोंगराळ भागातील बागयती क्षेत्रात महिला, शेतमजूर एकटे दुकटे जाण्यास भीत असल्याने शेतकामांस मजूरांची टंचाई निर्माण झाली आहे.

त्यातच मजूरीचे दर वाढल्याने शेतकऱ्यांचे अर्थकारण बिघडले आहे. अद्रक पीकां वरील रोगराई वरती होणारा भरमसाठ खर्च व तुलनेत मिळणारे कमी उत्पन्न व बाजारभाव यामुळे वैतागलेले बागायतदार ऊस शेती कडे वळाला आहे.

बिबट्यांच्या दहशती बरोबरच रानडुक्कर, रोही, हरणे, वानर यामुळे डोंगरा लगत च्या गावांतील शेतकऱ्यांना रात्र जागवून काढावी लागत आहे. परिणामी शेतकरी या पासून सुटका होण्यासाठी ऊस लागवड क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे.

गेल्या वर्षी झालेल्या दमदार पावसामुळे विहीर, बोरवेल, सिंचन प्रकल्पांत बर्या पैकी पाणी असल्याने व ऊस पीकाच्या मशागती, तणव्यवस्थापन, मजूरां वरती होणारा खर्च कमी असल्याने शेतकऱ्यांनी ऊस पीकाला पसंती दिल्याचे चित्र आहे.

## भाषातज्ज्ञ अशोक राणा यांची १९व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड



**छत्रपती संभाजीनगर :** येथे दिनांक २१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी आयोजित १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्य व संस्कृतीचे अभ्यासक, इतिहास संशोधक व भाषातज्ज्ञ डॉ. अशोक राणा (यवतमाळ) यांची निवड आज विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी यांनी पत्रकार परिषदेत घोषित केली. डॉ. अशोक राणा हे १८ व्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ग्रामीण साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांच्याकडून सूत्रे हाती घेतील. या वेळी विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे पदाधिकारी किशोर ढमाले व विद्रोही १९ वे विद्रोही साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष इंजि. सतिश चकोर, निमंत्रक धनंजय बोरडे हे उपस्थित होते.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ १९९९ पासून महाराष्ट्रभर कार्यरत आहे. महात्मा जोतिराव फुले यांनी ग्रंथकार सभेस पाठविलेले पत्र हा विद्रोहीचा वैचारिक जाहीरनामा आहे. न्या.म.गो. रानडेंनी ग्रंथकार सभेत सहभागी होण्याचे निमंत्रण म. जोतीराव फुले यांना दिले; तेव्हा ''तुमच्या ग्रंथांमध्ये अखिल मानवाचे हित होईल याचे बीज नाही.'' असे म्हणत म. फुलेंनी ''उंटावरून शेळ्या वळणाऱ्या घालमोड्या दादाच्या'' त्या संमेलनात सहभागी होण्यास ठाम नकार दिला होता. आमचे ग्रंथकार तयार होतील, तेव्हा ते स्वाभिमानाने आपली संमेलने भरवतील असेही म्हटले होते. ग्रंथकार सभेचे २० व्या शतकातील स्वरूप म्हणजे अ.भा. मराठी साहित्य संमेलन आहे. अ. भा. साहित्य संमेलन आणि महामंडळ यांचा आजवरचा व्यवहार हा विषमतावादी राहिला आहे. चिपळूणच्या साहित्य संमेलनात परशुरामाची मूर्ती स्टेजवर ठेवण्याचा आग्रह, ठाण्यात संमेलन स्मरणिकेत महात्मा यांच्या खुन्याचा पंडित नथुराम' असा उल्लेख करणे असेल. संयुक्त महाराष्ट्राचे सेनानी शाहीर अण्णाभाऊ साठे, शा. गव्हाणकर, शा. अमर शेख, शा. वामनदादा कर्डक,शा. यशवंत चकोर, क्रांतीसिंह नाना पाटील, भाई उद्धवराव पाटील, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, यांना संमेलनासाठी साधे निमंत्रणही न देणे; उलट अनेक दांभिकांना अध्यक्षपदे बहाल करणे, स्वातंत्र सैनिक व थोर गांधीवादी नयनतारा सहेगल यांना यवतमाळला उद्घाटक म्हणून बोलावून नंतर अपमानित करणे, संविधान जाळण्याचे समर्थन करणारांना प्रतिष्ठा देणे अशी अ.भा. मराठी साहित्य संमेलनाच्या विषमतावादाची असंख्य उदाहरणे आहेत. किंबहुना विषमतावादी सांस्कृतिक राजकारणाचे ते मूखंडच आहे. म्हणूनच ब्राह्मणी, भांडवली, पुरुषत्ताक मूल्य आणि विषमतावादी सांस्कृतिक विचारांचा विषारी प्रचार-प्रसार करणाऱ्या संस्था, संघटना व संमेलनाच्या विरोधात भूमिका घेण्याचा फुले-आंबेडकरांचा संदेश मानून आपण विचार व संघटित कृती केली पाहिजे.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ जीवनाच्या सर्व क्षेत्रात समतावादी संस्कृती व साहित्य विचारांचा पुरस्कार करते. विद्रोही साहित्य चळवळीच्या वतीने आजवर मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, सोलापूर, नंदुरबार, वाशी (नवी मुंबई), पुणे, मनमाड, धुळे, परभणी, बुलढाणा, हिंगोली, नाशिक, उदगीर, वर्धा, अमळनेर इत्यादी ठिकाणी साहित्य संमेलने, एक आंतरराज्य (निपाणी), एक विद्रोही महिला साहित्य संमेलन (पुणे) यशस्वीपणे आयोजित करण्यात आली आहे. कालकथित बाबुराव बागुल, कवी वाहरू सोनवणे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. अजिज नदाफ, आत्माराम कनिराम राठोड, कॉ. तारा रेड्डी, तुळसी परब, डॉ. आ. ह. साळुंखे, संजय पवार, जयंत पवार, उर्मिला पवार, डॉ. श्रीराम गुंदेकर, डॉ. प्रतिभा अहिरे. विमल मोरे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. आनंद पाटील, गणेश विसपुते, चंद्रकांत वानखेडे, डॉ. वासुदेव मुलाटे यांसारख्या सर्जनशील साहित्यिकांनी विद्रोही साहित्य संमेलनाची अध्यक्षपदे भूषविली आहेत.

डॉ. अशोक राणा हे मराठी साहित्य, भाषा, इतिहास, लोकसंस्कृती, प्रबोधन, संत वाङमय, आधुनिक समीक्षा, चित्रकला, नाट्य अशा विविध विषयांमध्ये पारंगत संशोधक म्हणून ख्यातनाम आहेत. त्यांची संशोधन व प्रबोधनपर ७६ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांनी ''विलास सारंग यांच्या कथांवरील अतिवास्तववादी छाया'' तसेच ''मराठी कथा व कवितांमधील नाग मिथक व प्रतिमा'' अशा आधुनिक व प्राचीन विषयांवरील अभ्यासापासून तरूण वयात संशोधनाला सुरूवात केली. त्यांनी भाषा व साहित्य या विषयात 'साहित्याची भाषा', साहित्य निर्मिती प्रक्रिया', 'मराठीच्या मानगुटीवर संस्कृतची वेलांटी', 'बहुजन साहित्य म्हणजे काय?', 'साहित्याची जात्यांधांची झुंडशाही', इत्यादी ५, प्राचीन इतिहास- मिथके-पुरातत्व-सण-उत्सव अशा लोकसंस्कृती संदर्भातील 'सिंधू जणांनी निऋती', 'शोध सरस्वतीचा', 'गणेश जन्माच्या कथेचा अर्थ', 'देवादिकांचे रहस्य', 'नागकथा व भूतपिशाच्च', 'कृषि विरूद्ध ऋषी', 'बौद्ध गणपती व सरस्वती', 'आदिमाया', 'सणांची सत्यकथा', 'मिथक साहित्य व संस्कृता' इत्यादी२३, प्रबोधनपर 'गाडगे बाबा, बाबासाहेब व भाऊसाहेब', 'डॉ. आंबेडकर व मातृदेवता', 'बुद्ध व बुद्धिप्रामाण्यवाद', 'वैज्ञानिक दृष्टिकोन व जादूटोणा', 'समरसतेचे वारकरी', 'मनुस्मृती-संघ व संविधान', 'राष्ट्रसंत तुकडोजी विचार इत्यादी १३, संत वाङमयासंदर्भातील 'वेदोक्त प्रकरण व संत साहित्य', 'रामदासी परंपरा व संत तुकाराम', 'सार्वकालिक संत तुकाराम', 'विठोबा कोणाचा?' इत्यादी ५, जिजाऊ, शिवकाल, छत्रपती संभाजी, आहिल्यामाई या मध्य युगाच्या अंतिम चरणातील इतिहासाबद्दल : 'आरोपीच्या पिंजऱ्यात संभाजी', 'शिवशाहीचा उदय', 'शिवरायांचा प्रताप', 'शिवचरित्राची शिकवण', 'शिवाजी शूद्र कसे?', 'शिवराज्याभिषेक १ ला व २ रा' अशी ११ पुस्तके, धर्म-ब्राह्मणी धर्म, शिवधर्म या संदर्भात 'शिवधर्म चिंतन', 'शिवधर्माची प्राथमिक संहिता', 'ब्राह्मणी धर्म व शिवधर्म इत्यादी ५, आणि संशोधन पद्धती इत्यादी संदर्भात 'इतिहास संशोधन क्लासिकल व मासिकल', 'इतिहासाचे विकृतीकरण', 'असत्याची सत्य कथा', 'डॉ. आ.ह. साळुंखे-साहित्य व विचार इत्यादी ३, अशी एकूण ७६ पुस्तके डॉ. अशोक राणा यांनी लिहिलेली आहेत.

पाश्चात्य व आफ्रीकी मातृदेवता, भगवत गीतेतील चार्वाक, 'सरस्वतीची सत्यकथा', 'कॉ. शरद पाटील यांची मिथक चिकित्सा', 'बसवेश्वरांचा देव' इत्यादी विषयांसंदर्भातील २६ पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. साप्ताहिक चित्रलेखा (संपादक-ज्ञानेश महाराव) मधील 'असत्याची सत्य कथा' आणि मातृपूजन विश्वभजन या डॉ. अशोक राणा यांच्या लेखमाला विशेष गाजल्या. 'रूजलेल्या व लादलेल्या मिथकांनी विकृत वळण घेऊन इतिहासाचा ताबा घेऊ नये याची संयतपणे काळजी घेत मिथकांमागील अर्थ-अन्वयार्थ स्पष्ट करण्याचा निरंतर प्रयत्न डॉ. अशोक राणा करत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ फेब्रुवारी २०२५


# सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन परीक्षेला सामोरे जावे

गणित विषयाच नाव घेतलं की बहुतांश विद्यार्थ्यांच्या पोटात गोळा येतो त्यांना गणिता बद्दल थोडीशी भीती वाटते आणि याचे महत्त्वाचे कारण अशा विद्यार्थ्यांना गणित विषयाच्या संकल्पना या चांगल्या प्रकारे समजलेल्या नसतात. आणि ज्या विद्यार्थ्यांना संकल्पना चांगल्या समजलेल्या नसतात असे विद्यार्थी गणित विषयाला टाळू लागतात पर्यायाने त्यांना गणित विषयात कमी गुण मिळतात परंतु मागील काही वर्षापासून गणित विषयाच्या प्रश्नपत्रिका च्या स्वरूपामध्ये बराचसा बदल झाला असल्यामुळे या विषयाला आता घाबरून जाण्याची काहीच गरज नाही.

यासाठी सुरुवातीला आपल्याला गणित म्हणजेच गणित भाग -१आणि गणित भाग- २ याचा पॅटर्न समजून घेणे हे फार महत्त्वाचे आहे.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दहावीचा सर्व विषयांचा अभ्यासक्रम बदललेला आहे. पूर्वीच्या अभ्यासक्रमातील काही भाग कमी करुन थोडा नवीन भाग वाढविलेला आहे. या अभ्यासक्रमाबरोबरच मूल्यमापन पद्धतीमध्येही बदल झालेला आहे. यासाठी आपल्याला दोन गोष्टी माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे पहिली गोष्ट म्हणजे गणित भाग-१ आणि गणित भाग-२ यामधील कोणत्या प्रकरणासाठी किती गुणांसाठी प्रश्न विचारले जातात आणि दुसरी गोष्ट म्हणजे प्रश्नपत्रिका चा आराखडा.

१) प्रकरणनिहाय गुणविभागणी
२) गणित-१ या विषयासाठी ४० गुणांची लेखी परीक्षा तसेच गणित भाग -२ या विषयाची ४० गुणांची लेखी परीक्षा तसेच गणित भाग-१ आणि गणित भाग- २ मिळून २० गुण अंतर्गत मूल्यमापनासाठी ठेवलेले आहेत.

अंतर्गत मूल्यमापनाच्या २० गुणांसाठी १० गुण हे स्वाध्यायासाठी आणि १० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा (विज्ञान विषयाप्रमाणे) घेण्यात येते. अंतर्गत मूल्यमापनाचे हे २० गुण शाळेमार्फत विद्यार्थ्यांना दिले जातात.

आता गणित भाग-१ आणि गणित भाग -२ या दोन्ही विषयाच्या लेखी परीक्षेच्या बाबतीत बघायचे झाले तर दोन्ही विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा आराखडा हा सारखाच असतो ज्यामध्ये ५ प्रश्न असतात. यामध्ये

**प्रश्न १ (अ आणि ब साठी )**

पहिला प्रश्न अ मध्ये ४ गुणांसाठी ४ बहुपर्यायी प्रश्न असतात हे बहुपर्यायी सोडवितांना लक्षात ठेवण्याची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे प्रश्नाचे उत्तर लिहिताना आपल्याला फक्त त्या प्रश्नाचा (A,B,C,D) यापैकी योग्य पर्याय लिहायचा असतो. जर समजा एखाद्या प्रश्न विद्यार्थ्यांने सोडवला आणि त्याचे उत्तर काढले परंतु पर्याय लिहिला नाही तर अशा वेळेस कदाचित त्या विद्यार्थ्याला गुण मिळू शकणार नाही.आणि प्रश्न १ ब सुद्धा चार गुणांचे चार प्रश्न असतात आणि आता मात्र हे चारही प्रश्नांची उत्तरे एक किंवा दोन पायऱ्यांमध्ये सोडवावे लागतात.

**प्रश्न २ (अ आणि ब साठी )**

प्रश्न दुसरा अ यामध्ये इतर विषयाप्रमाणे आपल्याला तीन पैकी कोणत्याही दोन कृती पूर्ण कराव्या लागतात आणि प्रत्येक कृतीसाठी दोन गुण असतात.म्हणजेच प्रश्न दुसरा अ साठी चार गुण असतात. ही कृती सोडवितांना लक्षात ठेवण्याची महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे यामध्ये एखाद्या संकल्पनेवर आधारित उदाहरण सोडविलेले असते आणि दोन गुणांसाठी चार रिकाम्या जागा असतात या चार रिकाम्या जागी आपल्याला आपले उत्तर लिहायचे असते प्रत्येक रिकाम्या जागेसाठी अर्धा गुण असतो तसेच लिहिलेल्या उत्तराला चौकट करणे अनिवार्य असते नसता आपले उत्तर बरोबर असतानाही गुण जाण्याची शक्यता असते.

यानंतर प्रश्न दुसरा ब च्या मध्ये पाच उपप्रश्न असतात त्यापैकी आपल्याला चार प्रश्न सोडवावे लागतात प्रत्येक प्रश्न हा दोन गुणांसाठी असतो म्हणजेच प्रश्न दुसरा ब हा ८ गुणांसाठी असतो.

**प्रश्न ३ (अ आणि ब साठी )**

प्रश्न तिसरा अ हा तीन गुणांसाठी असतो.यामध्ये आपल्याला प्रश्न दुसरा अ प्रमाणे दोन कृती दिलेल्या असतात आणि त्यापैकी आपल्याला कोणतीही एक कृती पूर्ण करायची असते या प्रश्नांमध्ये सुद्धा दिलेली कृती ही पाठ्यपुस्तकातील संकल्पनेवर आधारित उदाहरण सोडविलेले असते आणि तीन गुणांसाठी सहा रिकाम्या जागा असतात आणि येथे सुद्धा आपल्याला या सहा रिकाम्या जागी योग्य उत्तर लिहून चौकट करणे अनिवार्य असते.

प्रश्न तिसरा ब हा ६ गुणांसाठी असतो.या प्रश्नांमध्ये चार उपप्रश्न दिलेले असतात आणि या चार उपप्रश्नांपैकी आपल्याला कोणतीही दोन उपप्रश्न सोडवायचे असतात.

**प्रश्न ४ साठी**

प्रश्न चौथा हा प्रश्न आठ गुणांसाठी असतो यामध्ये तीन उपप्रश्न असतात आणि त्यापैकी आपल्याला कोणतेही दोन उपप्रश्न सोडवायचे असतात म्हणजेच एका उपप्रश्नाला चार गुण असतात. या प्रश्नातील सर्वच उपप्रश्न हे अभ्यासक्रमावर आधारित परंतु पाठ्यपुस्तका बाहेरील आव्हानात्मक असतात ज्या विद्यार्थ्यांना गणित भाग -१व भाग-२ मधील सर्व संकल्पना व्यवस्थित समजल्या असतील असे विद्यार्थी यामध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवू शकतात.

**प्रश्न ५ साठी**

प्रश्न क्रमांक ५ हा तीन गुणांसाठी असतो यामध्ये आपल्याला दोन उपप्रश्नांपैकी एक उपप्रश्न सोडवायचा आहे यामधील दोन्ही उपप्रश्न हे अभ्यासक्रमावर आधारित परंतु पाठ्यपुस्तका बाहेरील सृजनात्मक ( creative) स्वरूपाचे असतात.

थोडक्यात सांगायचे तर चौथा आणि पाचवा प्रश्न हा उपयोजनात्मक असतो ज्या विद्यार्थ्यांचा पाया पक्का असतो त्याचप्रमाणे ज्यांचा अभ्यास चांगला झालेला असतो असे विद्यार्थी या प्रश्नांमध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवू शकतात.

प्रश्नपत्रिका च्या या आराखड्यावरून असे लक्षात येते की प्रश्न क्रमांक एक ते प्रश्न क्रमांक तीन अ पर्यंतचे प्रश्न हे सर्व सामान्य विद्यार्थ्यांसाठी असतात आणि जर आपण याचा व्यवस्थित अभ्यास केला तर असे लक्षात येते की गणित भाग-१ आणि गणित भाग -२ यामधील प्रश्न एक आणि प्रश्न दोन हे दोन प्रश्न मिळून प्रत्येकी २० -२० गुण होतात म्हणजे ५०% गुण हे कोणत्याही विद्यार्थ्याला अगदी सहज मिळतात त्यामुळे सर्वसाधारण विद्यार्थ्यांनी गणिताबद्दलची भीती बाळगण्याचे मुळीच कारण नाही हेच बोर्डाने आखून दिलेल्या या प्रश्नपत्रिकेच्या आराखड्यावरून सिद्ध होते आणि याचा जर आपण बारकाईने विचार केला तर प्रश्न क्रमांक एक अ आणि ब हा ८ गुणांचा आहे आणि यामधील बहुतांश प्रश्न हे पाठ्यपुस्तकातीलच असतात म्हणजेच गणित भाग-१ मधील आपण सर्व बहुपर्यायी प्रश्न विचारात घेतले तर एकूण ४७ बहुपर्यायी प्रश्न पूर्ण पाठ्यपुस्तकात आणि त्याचप्रमाणे गणित भाग-२ मध्ये सर्व प्रकरणे मिळवून ४२ बहुपर्यायी प्रश्न आहेत म्हणजेच जर हे सर्व बहुपर्यायी प्रश्न व्यवस्थित केले तर भाग एक आणि भाग दोन यामधील ८+८ =१६ गुण हे कोणत्याही विद्यार्थ्याला सहज मिळू शकतात. आणि आणखी महत्वाचे म्हणजे गणित भाग १ साठी प्रश्न पहिला ८ गुण,संभाव्यता प्रकरणावर ८ गुणांसाठी तसेच सांख्यिकी प्रकरणावर १२ गुणांसाठीचे आणि पहिल्या प्रकरणातील आलेखावर आधारित ३ गुणांचा प्रश्न हे अतिशय सोपे असतात यातून विद्यार्थ्यांना ३१ गुण हे सहज मिळतात.

त्याचप्रमाणे गणित भाग २ साठी पहिला प्रश्न ८ गुणांसाठी तसेच भौमितिक रचना या प्रकरणावर ७ गुणांसाठीचे प्रश्न आणि पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रकरणातून तीन गुणांसाठीचे एक प्रमेय यातून विद्यार्थ्यांना १८ गुण हे अगदी सहज मिळता येऊ शकतात. आणि भाग दोन मधील पहिल्या तीन प्रकरणांमध्ये काही प्रमेय आहेत त्यापैकी महत्त्वाचे प्रमेय म्हणजे पहिल्या प्रकरणातील प्रमाणाचे मूलभूत प्रमेय,कोण दुभाजकाचे प्रमेय,समरूप त्रिकोणाच्या क्षेत्रफळाचे प्रमेय, दुसऱ्या प्रकरणातील पायथागोरसचे प्रमेय, तसेच पायथागोरस प्रमेयाचा व्यत्यास आणि तिसऱ्या प्रकरणांमधून स्पर्शिका खंडाचे प्रमेय आणि चक्रीय चौकोनाचे प्रमेय वरील सात प्रमेयांपैकीच एक प्रमेय ही परीक्षेला विचारले जाते आणि बहुतांश वेळा चक्रीय चौकोनाचे प्रमेय हेच परीक्षेला वारंवार विचारले आहेत यामुळे या प्रमेयाचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सराव करावा.

याशिवाय मला तर असं वाटते की सर्वसामान्य विद्यार्थ्यांनी मागील दोन-तीन वर्षाच्या बोर्डाच्या प्रश्नपत्रिका तसेच इतर प्रश्नपत्रिका या सर्व प्रश्नपत्रिकेतील प्रश्न पहिला,प्रश्न दुसरा आणि प्रश्न तिसरा हे जरी सोडवले तरी अशा विद्यार्थ्यांना सहजपणे ६० गुणांच्या वर गुण मिळू शकतात. प्रश्न तिसरा B मधील प्रश्नांची काठीण्य पातळी ही थोडी जास्त असते परंतु यामध्ये सुद्धा चार प्रश्नांपैकी कोणतेही दोन सोडवायचे असतात त्यामुळे पर्याय जास्त असल्यामुळे या प्रश्नांमधील उपप्रश्न विद्यार्थी सोडू शकतात.आणि जर समजा विद्यार्थ्यांनी बरेच पेपर सोडविले आणि त्यामध्ये त्यांचे प्रश्न तीन पर्यंत काहीच चुका होत नसतील आणि अशा विद्यार्थ्यांना जर गणितामध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवायचे असतील तर त्यांना प्रश्नपत्रिकातील प्रश्न चौथा आणि प्रश्न पाचवा म्हणजेच यामधून ११ गुण मिळवण्यासाठी पाठ्यपुस्तकातील प्रश्न संग्रहातील उदाहरणे तसेच स्टार केलेली उदाहरणे सोडविण्याचा जास्तीत जास्त सराव करावा त्याचप्रमाणे जास्तीत जास्त प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करावा म्हणजे त्यांनी सोडविलेल्या उदाहरणांसारखे प्रश्न त्यांना प्रश्नपत्रिका मध्ये दिसेल आणि तो प्रश्न ती विद्यार्थी सहज सोडवू शकतील.

शक्यतो घरी पेपर लिहिण्याचा सराव करत असताना टायमर — घड्याळ लावून पेपर सोडवण्याचा सराव करावा. पेपर चा सराव करत असताना कोणता प्रश्न सोडवण्यासाठी किती वेळ गेला हे सुद्धा लिहून ठेवत जा.

याशिवाय गणित भाग-१ पाठ्यपुस्तकामधील मधील ६ प्रकरणे आणि गणित भाग दोन पाठ्यपुस्तकामधील मधील ७ प्रकरणे मधील प्रत्येक प्रकरणाची तयारी करत असताना सर्व प्रकरणातील महत्त्वाची सूत्रे गुणधर्म व्यवस्थितपणे लिहून घ्यावीत आणि या प्रत्येक सूत्र किंवा गुणधर्म यावर आधारित पाठ्यपुस्तकातील २ ते ३ उदाहरणे आपल्या क्षमतेनुसार सोडून बघावी.

**गणिताचा पेपर सोडवताना घेण्याची दक्षता**

१) सर्वप्रथम जेंव्हा आपल्या हातात पेपर पडतो तेंव्हा कोणतीही घाई न करता सर्वप्रथम पाच ते दहा मिनिटे त्या पेपरचे व्यवस्थित वाचन करावे. आणि त्यानंतर जे उदाहरणे आपल्याला हमखास सोडविता येतात ते उदाहरणे अगोदर सोडून घ्यावीत. ज्या उदाहरणांसाठी आपल्याला थोडाफार विचार करावा लागणार आहे अशा उदाहरणासाठी जागा सोडवून पुढच्या प्रश्नातील उदाहरणे सोडवावी. २) आपली उत्तर पत्रिका ही नीटनेटकी किंवा चांगली असण्यासाठी आणि ती परीक्षकाला समजण्यासाठी नवीन प्रश्न नवीन पानावर सुरू करावा तसेच उपप्रश्नाचा योग्य क्रमांक उत्तर पत्रिकेवर लिहावा. ३) प्रश्न दोन A आणि प्रश्न तीन A या कृती प्रश्नांसाठी चौकट करणे अतिशय महत्त्वाचे असते नाहीतर उत्तर बरोबर असून देखील आपले गुण जाण्याची शक्यता आहे. ४) प्रत्येक प्रश्नांतील उपप्रश्न हे शक्यतो सलगत सोडवा. आणि नवीन प्रश्न नवीन पानावर सुरु करावा.त्याचप्रमाणे प्रश्नाचा क्रमांक व उपप्रश्नाचा क्रमांक योग्य पद्धतीने लिहावा. ५) उदाहरणे सोडवताना पायरी पायरीने सोडवावी.प्रत्येक गणितातील महत्त्वाच्या स्टेप्सला पेन्सिलन चौकट करावी.

६) प्रश्न व्यवस्थित वाचल्यानंतर कोणते उदाहरण कोणत्या पद्धतीने सोडविण्यास सांगितले आहे त्याच पद्धतीने ते उदाहरण सोडवावे. (जसे दिलेले वर्गसमीकरण अवयव पद्धतीने सोडवा किंवा पूर्ण वर्ग पद्धतीने सोडवा किंवा गणित भाग दोन मध्ये त्रिकोणमितीय गुणोत्तरे नित्य समानता वापरून सोडवा इ.) ७) आवश्यक त्या ठिकाणी एकके लिहावीत (उदा.cm,m unitsइ.)

८) कच्चे काम उत्तरपत्रिकेच्या शेवटच्या पानावर करावे आणि वरच्या बाजूस कच्चे काम (Rough work) असे लिहावे. ९) आलेख कागदावरील काम पेन्सिलनेच करावे. आलेखासाठी घेतलेल्या बिंदूंचे निर्देशक बिंदूच्या शेजारी लिहावे तसेच 2 रेषांच्या छेदनबिंदूला नाव देऊन त्याचे निर्देशक लिहावे. १०) आलेखाचे गणित सोडवताना त्यासाठी लागणारा तक्ता योग्य प्रकारे तयार करावा. आलेखामध्ये अक्षांना x आणि y असे नावे द्यावीत. अक्षांवर योग्य पद्धतीने प्रमाण घ्यावे आणि हे प्रमाण आलेख कागदाच्या वरच्या बाजूस उजव्या कोपऱ्यात लिहावे. ११) उत्तर लिहीत असताना खाडाखोड झाल्यास त्यावर ओव्हर राईट करण्याचा प्रयत्न करू नका. (प्रश्न १ला A मधील बहुपर्यायी प्रश्नांसाठी खाडाखोड टाळावी जसे पहिल्यांदा Aउत्तर लिहिले आणि नंतर ते खोडून Bहे उत्तर लिहिले असे करू नका) ११) वृत्तालेखामध्ये सारणी तयार करुन नंतरच वृत्तालेख काढावा. या वृत्तालेखामध्ये केंद्रिय कोनाचे माप आणि घटकाचे माप पेन्सिलने लिहावे. १२) पेपर लिहित असताना जे प्रश्न अतिरिक्त आहेत ते सुरुवातीला लिहू नका संपूर्ण पेपर लवकर लिहून झाल्यावर अशा प्रश्नांची उत्तरे लिहा. उदा. ३ पैकी दोन प्रश्न लिहायला सांगितली असतील तर दोन प्रश्नांची उत्तरे लिहून झाल्यावर तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर येत असले तरी लिहू नका. १२) गणित विषयाच्या प्रत्येक पेपरसाठी 2 तास वेळ असणार आहे. त्यादृष्टीने १ तास ४५मिनिटांमध्ये पेपर लिहिण्याचे नियोजन करुन शेवटच्या १५ मिनिटांमध्ये लिहिलेली उत्तरपत्रिका पूर्णपणे तपासून पाहावयाची आहे. अशा प्रकारे गणित विषयाचा चांगला अभ्यास करुन तसेच सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन परीक्षेला सामोरे जावयाचे आहे. कोणत्याही प्रकारचे दडपण किंवा टेन्शन न घेता एकाग्र मनाने पेपर लिहावा. सर्वांना परीक्षेसाठी खूप खूप शुभेच्छा.




**योगेश्वर दत्तात्रय निकम**
**शाळा :- महाराष्ट्र हिंदी विद्यालय शहागंज, छत्रपती संभाजीनगर**
**मोबाईल नंबर :- ९४२२८०९८४१**